संचालनालय, लेखा व कोषागारे , वित्त विभाग, महाराष्ट्र शासन,

ठाकरसी हाऊस, ३ रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, शुरजी वल्लभदास मार्ग,
फॉरेन पोस्ट ऑफिस समोर, मुंबई ४०० ००१

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२२२६२२०३६/६२२०२९ email :
jd.admin@mahakosh.in/ jd.reforms@mahakosh.in

-: जाहिरात :-

गट ब (राजपत्रित) संवर्गातील सेवानिवृत्त सहाय्यक लेखा अधिकारी यांना करार तत्त्वावर नेमणुक करणेबाबत.

संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई येथे महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील गट ' ब ' (राजपत्रित) सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गाच्या तीन सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची प्रथमत: सहा महिन्याच्या कालावधीकरीता कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती करावयाची आहे.

विभाग	विभागाचे नाव व पत्ता
मुंबई	संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई, ठाकरसी हाऊस, ३ रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, शुरजी वल्लभदास मार्ग, फॉरेन पोस्ट ऑफिस समोर, मुंबई-४०० ००१

१. कंत्राटी तत्त्वावर नेमलेल्या सेवानिवृत्त सहाय्यक लेखा अधिकारी यांचे पदनाम "समंत्रक" असे राहील. त्यांच्या कामाचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

अ.क्र.	कामाचे स्वरुप	कामाची व्याप्ती
	राजपत्रित शाखेमधील कामाचे स्वरुप	
१.	पदोन्नतीच्या अनुषंगाने ज्येष्ठता याद्यांचा तपशील तयार करणे	महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील गट ' ब ' (राजपत्रित) "सहाय्यक लेखा अधिकारी" संवर्गातून "लेखा अधिकारी" संवर्गात २००१ पासून दिलेल्या तदर्थ पदोन्नत्या नियमित करण्याच्या दृष्टीकोनातून सन १९९४ पासुनच्या ज्येष्ठता यादया तपासणे / दुरुस्ती करुन आवश्यक तो तपशील तयार करून तदर्थ पदोन्नत्या नियमीत करणे विषयक कामकाज.
२.	सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत अनुज्ञेय होणाऱ्या लाभासंबंधीत	"लेखा अधिकारी / सहाय्यक संचालक" संवर्गातील सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत (१०-२०-३० वर्षाच्या) लाभप्रदानाच्या अनुषंगाने आवश्यक ते सर्व कामकाज करणे. लाभप्रदानासाठी संबंधित शाखांकडुन माहिती प्राप्त करून घेवुन विहीत शासन निर्णयातील तरतूदीनुसार आवश्यक ते निकष पुतर्तेबाबतचे अभिलेख तयार करून कालबध्द पदोन्नती देण्याबाबतचे कामकाज.

सहाय्यक लेखा अधिकारी (राजपत्रित) शाखेकरिता		
१.	सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत अनुज्ञेय होणारा पहिला लाभ (नियमित १० वर्षे)	पदोन्नतीच्या पदाकरिता विहीत केलेली अर्हता, ज्येष्ठता, पात्रता अर्हता परीक्षा, विभागीय परीक्षा उत्तीर्ण असणे, गोपनीय अहवालाची प्रतवारी, विभागीय चौकशी व न्यायिक प्रकरण प्रलंबित नसणे (शासन निर्णय सा.प्र.वि.दि.१५.१२.२०१७ नुसार), यथास्थिती जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध असणे अशा सर्व बाबींची पडताळणी करून माहिती सादर करणे.
२.	सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या वेतन अभिवृद्धी / उंचावणे / एकवटणे.	सर्व सहसंचालक कार्यालये व अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेले वेतननिश्चिती जोडपत्रे छाननी करून अहवाल सादर करणे.
३.	स्थायित्व प्रमाणपत्र	वर्षनिहाय पदोन्नती देण्यात आलेल्या सहाय्यक लेखा अधिकारी यांना स्थायित्व प्रमाणपत्र देणेबाबत आवश्यक असलेल्या बाबींची छाननी करून त्याबाबतचा अहवाल सादर करणे.
४.	वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलीकडे अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर पुनर्विलोकन करणे.	सदरील विषयांच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या बाबींची- शारिरीक क्षमता / प्रकृतीमान, निर्विवाद सचोटी व चांगला पेक्षा कमी नाही अशा कार्यमुल्यमापन अहवालांचे गुणांकन तपासणे इत्यादी छाननी करून अहवाल सादर करणे.
वरील विषयाच्या अनुषंगाने येणारी आवश्यक ती इतर सर्व मूळ स्वरुपातील कामे करणे. **सदर कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे अनिवार्य राहील.**		

२. कंत्राटी तत्वावर / करार पद्धतीने नियुक्ती शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण - २७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर २०१६ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार करण्यात येईल व कंत्राटी / करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांना या शासन निर्णयातील तरतुदीनुसार मासिक पारिश्रामिक अनुज्ञेय असेल. एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार कालावधीसाठी कायम राहील.

३. गट ' ब ' (राजपत्रित) "सहाय्यक लेखा अधिकारी" संवर्गाच्या कंत्राटी समंत्रकांची निवड/ नेमणुक ही मुख्यालयाकरिता संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई येथे होत असून इच्छुक सेवानिवृत्त अधिका-यांनी आपला अर्ज सोबतचे विहित नमुन्यामध्ये संचालनालयात टपालाद्वारे / हस्तबटवड्याने विहित मुदतीत सादर करावेत. संचालनालय स्तरावर यांसंबंधित कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. यापुर्वी महाकोषवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या नामिकासूचीबाबतच्या विविध जाहिरातींच्या अनुषंगाने सादर केलेले अर्ज या पदाचे जाहिरातीकरिता ग्राह्य धरले जाणार नाहीत. तरी संबंधितांनी विहित नमुन्याप्रमाणे नव्याने अर्ज सादर करावेत.

४. कंत्राटी / करार तत्वावर नियुक्तीसाठी केवळ अर्ज सादर केला या कारणास्तव संबंधित उमेदवार नियुक्तीस पात्र असणार नाहीत. विहित करण्यात आलेल्या कामाचे स्वरुप, संबंधित उमेदवारांचा त्या कामाबाबतचा पूर्वानुभव आणि त्याकरिता निश्चित करण्यात आलेल्या इतर अटी व शर्तींची पूर्तता यांचा विचार करून आवश्यकतेनुसार ठराविक कालावधीकरीता वरील शासन निर्णयानुसार प्रथमत: केवळ सहा महिन्यांकरिता नियुक्ती करण्यात येईल.

५. करार / कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या अधिकारी वयाच्या ६५ वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

६. कंत्राटी / करार पद्धतीने नियुक्तीकरिता अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराविरुद्ध विभागीय चौकशीची कोणतीही कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. याबाबत या कार्यालयाकडुन खातरजमा करण्यात येईल आणि विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु असलेल्या अथवा विभागीय चौकशीमध्ये शिक्षा झालेला उमेदवार निवड आणि नियुक्तीकरिता अपात्र ठरविण्यात येईल..

७. विशेष परिस्थितीमध्ये कंत्राटी / करार पद्धतीने निवड आणि नियुक्त झालेल्या संबंधित अधिकाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्याचा अथवा कंत्राट / करार कालावधी कमी करण्याचा अधिकार संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांना राहील.

८. कंत्राटी / करार तत्वावर नियुक्त करण्यात आलेले अधिकारी यांना त्यांचेवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक असेल तसेच त्यांना पर्यवेक्षीय अधिकार असणार नाहीत. त्यांच्या कामकाजाबाबत सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई हे वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

९. अशा करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

११. कंत्राटी / करार तत्वावर नियुक्ती देण्यात आलेले अधिकारी यांना सामान्य शासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७-१२-२०१६ मधील व त्यानंतर वेळोवळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

१२. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित नमुन्यातील अर्ज mahakosh.maharashtra.gov.in / Maharashtra .gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत दि. ३०.१२.२०१९ पर्यंत राहील.

(ज. र. मेनन)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

दिनांक :- ३०.११.२०१९
ठिकाण :- मुंबई